| | | |
|---|---|---|
| महाराष्ट्र पोलीस | **रावेर पोलीस स्टेशन**<br>फोन नंबर ०२५८४-२५०३३३<br>Email Id :- raverpi2@gmail.com | |
| रावेर पोलीस स्टेशन | जावक क्रमांक - /२०२५ | दिनांक :- ०४/१२/२०२५ |

## प्रेस नोट

**मा.संपादक सो.**

------------

# रावेर गुन्हे शोध पथकाने सोन साखळी चोरीचे दोन गुन्हे उघडकीस आणुन सराईत चोरांना केली अटक...

**रावेर पोलिस स्टेशन येथे दि. ०१-१२-२०२५ रोजी गुरंन ४७४/२०२५ मा.न्या.संहीता कलम ३०४ (२) प्रमाणे गळयातील सोनसाखळी जबरी चोरीचा गुन्हा दाखल होता.**

**सदर गुन्हयात फिर्यादी नामे सौ. शोभाबाई सुरेश पाटील वय-४७ रा. वाघोड ता.रावेर हे दि. ०१/१२/२०२५ रोजी १५.०० वाजेच्या सुमारास रावेर येथुन कर्जोत फाटा येथे उतरुन घरी वाघोड येथे रोडाने स्मशानभुमी समोरुन पायी जात असतांना दोन इसम हे लाल काळया रंगांच्या बजाज पल्सर वर आले व फिर्यादी यांचे जवळ थांबुन खिरवड जाण्याचा रस्ता विचारुन फिर्यादी यांच्या तोंडावर माती फेकुन फिर्यादी यांचे गळयातील १० ग्रॅम वजनाची सोन्याची मंगळसुत्र (पोत) बळजबरीने ओरबाडुन तोडुन घेवुन गेल्याने सदर इसमांविरुध्द रावेर पोलिस स्टेशन ला गुन्हा दाखल करण्यात आलेला होता.**

**रावेर शहरात दि. ०१/१२/२०२५ रोजी निवडणुकीची तयारी सुरु असतांना अशी घटना घडुन आली सदर घटनेचे गांभीर्य लक्षात घेता डॉ. विशाल जयस्वाल पो.निरीक्षक रावेर पो.स्टे. यांनी घटना समजताच रावेर गुन्हे शोध पथकास घटनास्थळी रवाना केले. सदर घटनास्थळी पोहचतास परीसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले परंतु फुटेज मध्ये आरोपीतांचे चेहरे स्पष्ट दिसत नव्हते. परंतु पुढे आरोपीतांचा येण्याचा व जाण्याचे दोघी मार्गाची तातडीने शोध घेण्यात आला तेव्हा आरोपी हे काही काळ रावेर शहरात रेकी केल्यानंतर वाघोड कडे गेल्याचे एका सीसीटीव्ही फुटेज मध्ये दिसले. तसेच सदर फुटेज मध्ये आरोपीतांच्या वाहनाचा व शरीरयष्टी चा तंतोतंत सुगावा लागला. आरोपी यांनी रेकी करीत असतांना बराच वेळ रावेर शहरात मुक्काम केल्याने तांत्रिक माहीतीच्या आधारे आरोपीतांची ओळख पटविण्यात पोलिसांना यश आले. तांत्रिक माहीती प्राप्त होताचा एकीकडे गुन्हा दाखल करण्याची तयारी सुरु असतांना रावेर गुन्हे शोध पथक हे आरोपीताचा सुगावा घेत आरोपीताच्या गावात अंतुर्ली ता.मुक्ताईनगर येथे पोहचली व गावात आरोपीतांची गुप्त माहीती घेतली असता आरोपी हे गावातुन फरार झाले असल्याचे कळाले परंतु रावेर गुन्हे शोध पथकास वेळोवेळी सुचना करुन पोलिस निरीक्षक विशाल जयस्वाल यांनी तेथेच थांबुन आरोपीतांचा शोध घेण्यास सांगीतल्याने गुन्हे शोध पथक**

हे अंतुर्ली गावाला लागुन शेतात तळ ठोकुन होते. व काही तासांच्या अथक परीश्रमातुन आरोपी हे गावात आल्याची माहीती मिळाली त्यावरुन आरोपी यांना पकडण्यास पथक गेले असता आरोपीतांना पोलिसांचा सुगावा लागल्याने आरोपी हे नरवेल ता. मुक्ताईनगर रोडने वाहनावर सुसाट पळु लागले होते काही अंतर पाठलाग केल्यानंतर आरोपीतांना पकडण्यात गुन्हें शोध पथकास यश आले.

सदर गुन्हयात आरोपी क्र. ०१ ) अजय गजानन बेलदार वय- २० आरोपी क्र. ०२) नरेंद्र उर्फ निलेश अशोक बेलदार वय-२० दोघी रा. अंतुर्ली ता.मुक्ताईनगर जि.जळगांव यांना सदर गुन्हयात अटक करण्यात आली आहे. आरोपीतांना गुन्हयाच्या एकंदर तपासात विश्वासात घेवुन विचारपुस केली असता आरोपीतांनी दि. ०३/११/२०२५ रोजी कुऱ्हा काकोडा बस थांब्याजवळुन एका महीलेच्या गळयातुन १० ग्रॅम वजनाची सोनसाखळी चोरल्याचे कबुल केले आहे. त्या बाबत कुऱ्हा काकोडा दुरक्षेत्र मुक्ताईनगर पो.स्टे येथे ३३५/२०२५ प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

जप्त मुद्येमाल :- ०१) ७५,०००/- रुपये किमतीची गुन्हयात वापरलेली विना नंबर प्लेटची बजाज पल्सर दुचाकी

०२)१,७५,०००/- रुपये किमतीचे १३.३०४ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागीने.

असा एकुन २,५०,०००/- रुपये किमतीची मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे.

आरोपीताकडुन अजुन गुन्हे घडले आहे काय ? या बाबत पुढील तपास चालु आहे.सदर गुन्हयात आरोपीताला अटक करुन मा.न्यायालयात हजर करुन दोन दिवसांची पोलिस कोठडी घेण्यात आली आहे.

सदर कार्यवाही ही मा. डॉ. श्री महेश्वर रेडडी सो पोलिस अधिक्षक जळगांव , मा. श्री अशोक नखाते सो अप्पर पो. अधिक्षक जळगांव विभाग, मा.श्री अनिल बडगुजर सो पोलिस उपअधिक्षक फैजपुर विभाग यांच्या मार्गदर्शनाने पोलिस स्टेशन रावेर मधील पो.नि.डॉ विशाल जयस्वाल , पो.उप.निरीक्षक तुषार पाटील गुन्हे शोध पथकातील पो.ना.कल्पेश आमोदकर, पो.शि. विशाल पाटील ,प्रमोद पाटील, श्रीकांत चव्हाण , सुकेश तडवी, विकार शेख , भुषण सपकाळे , अतुल गाडीलोहार, यांनी आरोपीताचा शोध घेतला असुन सायबर पोलिस स्टेशनचे मिलींद जाधव व गौरव पाटील यांनी वेळोवेळी तांत्रिक माहीती दिली आहे. गुन्हयाचा पुढील तपास हे पो.उप.निरीक्षक तुषार पाटील करीत आहेत.

s/d

(डॉ. विशाल जयस्वाल)
पोलिस निरीक्षक
रावेर पोलिस स्टेशन



महाराष्ट्र पोलीस
रावेर पोलीस स्टेशन
रावेर.